# अनुक्रमणिका


केवढे हे क्रौर्य! - ना.वा.टिळक....6

कणा - कुसुमाग्रज....7

या झोपडीत माझ्या - संत तुकडोजी महाराज. ....8

खबरदार जर टाच मारुनी - वा. भा पाठक ....9

आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे - बालकवी....11

उठा उठा चिऊताई- कुसुमाग्रज ....12

श्रावणमासि हर्ष मानसी - बालकवी ....13

रे हिंदबांधवा, थांब या स्थळी - भा. रा. तांबे ....14

खोपा - बहीणाबाई ....15

मन वढाय वढाय - बहीणाबाई....16

पिपांत मेले ओल्या उंदिर - बा.सी.मर्ढेकर ....17

एका तळ्यात होती - ग.दि.माडगूळकर ....18

पैठणी - शांता शेळके ....19

गाई पाण्यावर - कवी बी ....20

फुलपांखरूं - ग.ह.पाटील ....21

टप टप टाकित टापा - शांता शेळके ....22

आजीचे घड्याळ - केशवकुमार....23

औदुंबर....24

प्रेम कर भिल्लासारख....25

फुलराणी - बालकवी ....26

गवतफुला - इंदिरा संत ....28

तुतारी - केशवसुत ....29

विचित्र वीणा - बा. भ. बोरकर ....31


Preview from Notesale.co.uk
Page 2 of 104

## कणा - कुसुमाग्रज

ओळखलंत का सर मला, पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी

क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली गेली घरट्यात राहून

माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली

भिंत खचली, चूल विझली होते नव्हते गेले
प्रसाद म्हणुन पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले

कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे
चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!

Preview from Notesale.co.uk
Page 7 of 104

# फुलपांखरूं - ग.ह.पाटील

फुलपांखरूं !
छान किती दिसतें । फुलपाखरूं

या वेलीवर । फुलांबरोबर
गोड किती हसतें । फुलपांखरूं

पंख चिमुकलें । निळेजांभळे
हालवुनी झुलतें । फुलपांखरूं

डोळे बरिक । करिती लुकलुक
गोल मणी जणुं ते । फुलपांखरूं

मी धरुं जाता । येई न हाता
दूरच तें उडते । फुलपांखरूं

Preview from Notesale.co.uk
Page 21 of 104

# विचित्र वीणा - बा. भ. बोरकर

निळया जळावर कमान काळी कुठे दुधावर आली शेते
थंडाव्याची कारंजिशी कुठे गर्द बांबूची बेटे

जिकडे तिकडे गवत बागडे कुठे भिंतिच्या चढे कडेवर
ती म्हातारी थरथर कापे सुखासवे होउनी अनावर

तारांमधला पतंग कोठे भुलून गेला गगनमंडला
फणा डोलवित झोंबू पाहे अस्त-रवीच्या कवचकुंडला

उंचवट्यावर म्हशी गोठल्या तसेच कोठे काजळ काळे
वर्ख तृप्तीचा पानोपानी बघून ज़ाले ओले-ओले

कोठे तुटल्या लाल कड्यावर चपळ धीट बकरीची पोरे
एक त्यातले लुचे आईला सटीन कान्ती गोरे गोरे

फुलपाखरी फूल थव्यावर कुठे सांडली कुंकुमटिंबे
आरस्पानी पाण्यावरती तरत्या बगळयांची प्रतिबिंबे

कुठे आवळीवरी कावळा मावळतीचा शकून सांगे
पूर्वेला राऊळ इंद्राचे कोरीव संगमरवरी रंगे

घाटामध्ये शिरली गाडी अन् रात्रीचा पडला पडदा
पण चित्रांची विचित्र वीणा अजून करते दिडदा दिडदा

Preview from Notesale.co.uk
Page 31 of 104

# गणपत वाणी - बा.सी. मर्ढेकर

गणपत वाणी बिडी पिताना
चावायाचा नुसतीच काडी;
म्हणायचा अन मनाशीच की
या जागेवर बांधिन माडी;

मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी,
भिरकावुनि ती तशीच ध्यायचा
लकेर बेचव जैसा गवयी.

गि~हाईकाची कदर राखणे;
जिरे, धणे अन धान्यें गळित,
खोबरेल अन तेल तिळीचे
विकून बसणे हिशेब कोळित;

स्वप्नांवरती धूर सांडणे
क्वचित बिडीचा वा पणतीचा
मिणमिण जळत्या; आणि लेटणे
वाचित गाथा श्रीतुकयाचा.

गोणपटावर विटकररंगी
सतरंजी अन उशास पोते;
आडोशाला वास तुपाचा;
असे झोपडे राहत होते.

काडे गणपत वाण्याने ज्या
हाडांची ही ऐशी केली
दुकानातल्या जमीनीस ती
सदैव रुतली आणिक रुतली.

काड्या गणपत वाण्याने ज्या
चावुनि चावुनि फेकुन दिधल्या,
दुकानांतल्या जमीनीस त्या
सदैव रुतल्या आणिक रुतल्या.

गणपत वाणी बिडी बापडा
पितांपितांना मरून गेला;
एक मागता डोळे दोन
देव देतसे जन्मांधाला

Preview from Notesale.co.uk
Page 32 of 104

# देणा-याने देत जावे - विंदा करंदीकर

देणा-याने देत जावे
घेणा-याने घेत जावे

हिरव्या पिवळ्या माळावरुनी
सह्याद्रीच्या कड्यावरुनी
छातीसाठी ढाल घ्यावी

वेड्यापिशा ढगाकडून
वेडेपिसे आकार घ्यावे
रक्तामधल्या प्रश्नासाठी
पृथ्वीकडून होकार घ्यावे

उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी
भरलेल्या भिमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी

देणा-याने देत जावे
घेणा-याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणा-याचे हात घ्यावे.

Preview from Notesale.co.uk
Page 43 of 104

# घरटा - बालकवी

चिव चिव चिव रे
तिकडे तू कोण रे ?

कपिलामावशी कपिलामावशी
घरटा मोडून तू का जाशी ?

नाही गं बाई मुळीच नाही
मऊ गवत देईन तुशी

कोंबडीताई कोंबडीताई
माझा घरटा पाहिलास बाई ?

नाही गं बाई मुळीच नाही
तुझा माझा संबंध काही

कावळेदादा कावळेदादा
माझा घरटा नेलास बाबा ?

नाही गं बाई चिमणुताई
तुझा घरटा कोण नेई ?

आता बाई पाहू कुठे ?
जाऊ कुठे ? राहू कुठे ?

गरीब बिचाऱ्या चिमणीला
सगळे टपले छळण्याला

चिमणीला मग पोपट बोले
का गं तुझे डोळे ओले?

काय सांगू बाबा तुला
घरटा माझा कोणी नेला

चिऊताई चिऊताई
माझ्या घरट्यात येतेस बाई ?

पिंजरा किती छान माझा
सगळा शीण जाईल तुझा

जळो तुझा पिंजरा मेला
त्याचे नाव नको मला

राहीन मी घरट्याविना
चिमणी उडून गेली राना

Preview from Notesale.co.uk
Page 46 of 104

# रुद्रास आवाहन - भा. रा. तांबे

डुमडुमत डमरू ये, खणखणत शूल ये,
शंख फुंकत ये, येई रुद्रा!
प्रलयघनभैरवा, करीत कर्कश खा
क्रूर विक्राळ घे क्रुध्द मुद्रा !

कडकडा फोड नभ, उडव उडुमक्षिका,
खडबडवि दिग्गजां, तुडव रविमालिका,
मांड वादळ, उधळ गिरी जशी मृत्तिका
खवळवीं चहुंकडे या समुद्रां !

पाड सिंहासने दुष्ट हीं पालथीं,
ओढ हत्तीवरुनी मत्त नृप खालती,
मुकुट रंकास दे, करटी भूपाप्रती,
झाड खटखट तुझें खड्ग क्षुद्रां !

जळ तडागं सडे, बुडबुडे, तडतडे
"शांति ही!" बापुडे बडबडति जन-कीडे !
धडधडा फोड तट! रुद्र ये चहुंकडे,
धगधगित अग्निमंधि उजळ भद्रा !

पूर्वी नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयीं अन्य गृहीं दरवडे पाडिले,
बनुनि नृप, तापुनी चंड, जन नाडिले
दे जयांचें तयां वीरभद्रा!

-

Preview from Notesale.co.uk
Page 59 of 104

# कोठुनि येते मला कळेना - बालकवी

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला ।।

येथे नाही तेथे नाही,
काय पाहिजे मिळावयाला?
कुणीकडे हा झुकतो वारा?
हाका मारी जीव कुणाला?

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला !

Preview from Notesale.co.uk
Page 60 of 104

# देवाचे घर - ग. दि. माडगूळकर

इवल्या इवल्याशा, टिकल्या-टिकल्यांचे
देवाचे घर बाइ, उंचावरी
ऐक मजा तर ऐक खरी

निळी निळी वाट, निळे निळे घाट
निळया निळया पाण्याचे झुळझुळ पाट
निळया निळया डोंगरात निळी निळी दरी

चांदीच्या झाडांना सोन्याची पाने
सोनेरी मैनेचे सोनेरी गाणे
सोन्याची केळी, सोन्याचा पेरू
सोनेरी आंब्याला सोन्याची कैरी

देवाच्या घरात गुलाबाची लादी
मऊ मऊ ढगांची अंथरली गादी
चांदण्यांची हंडी, चांदण्यांची भांडी
चांदोबाचा दिवा मोठा लावला वरी

-

Preview from Notesale.co.uk
Page 64 of 104

# बाभुळझाड - वसंत बापट

अस्सल लाकूड, भक्कम गाठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात गारा खात
बाभुळझाड उभेच आहे ॥ १ ॥

देहा फुटले बारा फाटे
अंगावरचे पिकले काटे
आभाळात खुपसून बोटे
बाभुळझाड उभेच आहे ॥ २ ॥

अंगावरची लवलव मिटली
माथ्यावरची हळद विटली
छाताडाची ढलपी फुटली
बाभुळझाड उभेच आहे ॥ ३ ॥

जगले आहे जगते आहे
काकुळतीने बघते आहे
खांदयावरती सुतारांचे
घरटे घेउन उभेच आहे ॥ ४ ॥

Preview from Notesale.co.uk
Page 75 of 104

# आम्ही कोण? - प्र. के. अत्रे

[केशवसुत यांच्या "आम्ही कोण?" या मुळ कवितेचे प्र. के. अत्रे यांनी केलेले विडंबन]

'आम्ही कोण?' म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी?
'फोटो' मासिक पुस्तकात न तुम्ही का अमुचा पाहिला?
किंवा 'गुच्छ' 'तरंग' 'अंजली' कसा अद्यापि न वाचला?
चाले ज्यावरती अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनी?

ते आम्ही - परवाङ्मयातील करू चोरुन भाषांतरे,
ते आम्ही - न कुणास देऊ अगदी याचा सुगावा परी!
डोळ्यांदेखत घालुनी दरवडा आम्ही कुबेराघरी!
त्याचे वाग्धन वापरून लपवू ही आमुची लक्तरे!

काव्याची भरगच्च घेउनि सदा काखोटिला पोतडी,
दावू गाउनी आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधे,
दोस्तांचे घट बैसवून करु या आम्ही तयांचा 'उदे'
दुष्मानावर एकजात तुटुनी की लोंबवू चामडी!

आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील साप्ताहिके!
आम्हाला वगळा-खलास सगळी होतील ना मासिके!

Preview from Notesale.co.uk
Page 77 of 104

# घड्याळ - केशवसुत

गडबड घाई जगात चाले,
आळस डुलक्या देतो पण;
गंभीरपणें घड्याळ बोले --
'आला क्षण -- गेला क्षण' १

घड्याळास या घाई नाहीं,
विसांवाहि तो नाहीं पण;
त्याचें म्हणणें ध्यानीं घेईं --
'आला क्षण -- गेला क्षण' २

कर्तव्या जे तत्पर त्यांचें
दृढ नियमित व्हावयास मन,
घड्याळ बोले अपुल्या वाचे --
'आला क्षण -- गेला क्षण' ३

कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयीं हाणित घण,
काळ -- ऐक! -- गातो अपुल्याशी
'आला क्षण -- गेला क्षण' ४

लव्याजम्याचे हत्ती झुलती
लक्ष त्यांकडे देतो कोण,
मित रच जर हे सावध करिती --
'आला क्षण -- गेला क्षण' ५

आनंदी आनंद उडाला,
नवरीला वर योग्य मिळाला!
थाट बहुत मंडपात चाले --
भोजन, वादन, नर्तन, गान!
काळ हळू ओटीवर बोले --
'आला क्षण -- गेला क्षण' ६

Preview from Notesale.co.uk
Page 87 of 104

"कौतुक भारी वाटे लोकां
दाखविण्या पाहण्या दिमाखा,
तेणें फुकटचि जिणें होतसे!
झटा! करा तर सत्कृतिला!"
सुचवित ऐसें, काळ वदतसे --
'क्षण आला -- क्षण गेला!' ७

वार्द्धक जर सौख्यांत जावया
व्हावें, पश्चात्ताप तुरुनियां,
तर तरुणा रे! मला वाटतें,
ध्यानीं संतत अपुल्या आण
घड्याळ जें हे अविरत वदतें --
'आला क्षण -- गेला क्षण!' ८

# अनंत - बालकवी

अनंत तारा नक्षत्रे ही अनंत या गगनात
अनंत दीप्ती, अनंत वसुधा, हे शशिसूर्य अनंत.
वरती खाली सर्व साठले वातावरण अनंत,
माप कशाचे, कुणा मोजिता, सर्व अनंत अनंत।

कितेक मानव झटती, करिती हाडाचेही पाणी,
अनंत वसुधा आजवरी हो परी मोजली कोणी!
म्हणोत कोणी 'आम्ही गणिला हा ग्रह- हा तारा,'
परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा?

विशाल वरती गगन नव्हे, हे विश्वाचे कोठार,
उदात्ततेचा सागर हा, चिच्छांतीचा विस्तार.
कुणी मोजिला, कुणास त्याची लांबीरूंदी ठावी?
फार कशाला दिग्वनिंताची तरी कुणी सांगावी?

अनंत सारे विश्व जाहले अनंतात या लीन,
क्षुद्र मानवा, सांग कशाचा बाळगिसी अभिमान?
तव वैभव हे तुझे धनी ही, हे अत्युच्च महाल,
जातिल का गगनास भेदूनि? अनंत का होतील?

तुझ्या कीर्तिचे माप गड्या का काळाला मोजील!
ज्ञान तुझे तू म्हणशी 'जाईल', कोठवरी जाईल?
'मी' 'माझे' या वृथा कल्पना, तू कोणाचा कोण?
कितेक गेले मी मी म्हणता या चक्री चिरडून।

Preview from Notesale.co.uk
Page 90 of 104

# टप टप पडती अंगावरती - मंगेश पाडगावकर

टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर भिर भिर भिर त्या तालावर गाणे अमुचे जुळे !

कुरणावरती, झाडांखाली
ऊन-सावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले !

दूर दूर हे सूर वाहती
उन्हात पिवळ्या पाहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले !

गाणे अमुचे झुळ-झुळ वारा
गाणे अमुचे लुक-लुक तारा
पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले !

फुलांसारखे सर्व फुला रे
सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे बाकी सारे खुळे !

Preview from Notesale.co.uk
Page 91 of 104

## विद्याप्रशंसा - कृष्णशास्त्री चिपळूणकर

[आर्या]

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्टत्व ह्या जगामाजीं;
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. !! १ !!
व्यासदिक आद्य मुनी कवि अर्वाचीन सर्वथोर तसे
म्हणती एकमतें कीं, धन विद्यासम नरास अन्य नसे. !! २ !!
देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे
ऐसे एकच विद्या-धन, अद्‌भुत गुण न हा दुज्यांत वसे. !! ३ !!
न बलात्कारें राजा, न चोर कपटें, जया हरायास
होई समर्थ, ज्याच्या अल्पहि संरक्षणीं न आयास.!! ४ !!
नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार;
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. !! ५ !!
या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं;
अनुकूळ ती जयाला नित्य तयाला उणें नसे कांहीं !! ६ !!
गुरुपरि उपदेश करी, संकट्-समयीं उपायही सुचवी,
चिंतित फल देउनियां कल्पतरूपरि मनोरथां पुरवी. !! ७ !!
विद्याबलसम अढळे न दुजें बल कोणतेंहि या लोकीं;
तीनें निजप्रभावें वश केलें सकल विश्व, अवलोकीं ! !! ८ !!
क्षुद्रा पशुपक्ष्यांची काय कथा? पांचही महाभूतें
ज्ञानबळें आकळुनी केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. !! ९ !!
विसरुनि परस्परांचा विरोध जल वन्हि सेविती त्यातें;
दासापरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें. !!१० !!
त्याचीं वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटितीहि नौकातें;
बहु सांगणें कशाला? करिती तो सांगतो तयां तें तें ! !! ११ !!
मोठे मोठे तरुवर मोडी, फोडीहि जी शिलारशी,
विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी ! !! १२ !!
विद्येच्या सामर्थें केला रवि चित्रकार सुजान;
होउनि अंकित वायुहि [illegible] सुस्वरें गानें ! !! १३ !!
यापरि स[illegible] देइ, दुःखें समस्त [illegible]
त्या विद्यादेवींते अनन्यभावें सदा भजा [illegible]री. !! १४ !!
नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन
सत्य असे तरि विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न.!! १५ !!
ऐश्वर्यबलधनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी कांहीं,
ती विद्या जो देई, तेणें वद काय तें दिलें नाहीं? !! १६ !!

Preview from Notesale.co.uk
Page 99 of 104

# मामाची गाडी - ग. ह. पाटील

माझ्या मामाची रंगीत गाडी हो
तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो

कशी दौडत दौडत येई हो
मला आजोळी घेऊन जाई हो
नाही बिकट घाट,
सारी सपाट वाट,
मऊ गालीचे ठायी ठायी हो

शीळ घालून मंजूळ वाणी हो
पाजी बैलांना ओहोळ पाणी हो
गळा खुळखुळ घुंगुर माळा हो
गाई किलबील विहंग मेळा हो
बाजरीच्या शेतात,
करी सळसळ वात,
कशी घुमली अंबेराई हो

कोण कानोसा घेऊन पाही हो
कोण लगबग धावून येई हो
गहिवरून धरून पोटी हो
माझे आजोबा चुंबन घेती हो
लेक एकुलती,
नातू एकुलता,
किती कौतुक कौतुक होई हो

Preview from Notesale.co.uk
Page 104 of 104